# MAHARASHTRA FENCING ASSOCIATION

**Affiliated to :** • Fencing Federation of India
• Maharashtra Olympic Association
• Maharashtra State Sports Council

# अहवाल

## २०१५-१६

वार्षिक सर्वसाधारण सभा

दि.२० मे २०१६, नाशिक

Scanned with CamScanner

# सभेची सुचना

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२०/०५/२०१६ रोजी नवरंग मंगल कार्यालय, पंचवटी, नाशिक येथे सायं.६.०० वा. संपन्न होणार आहे. सभेत खालील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यात येणार आहे. आपल्या जिल्ह्याचे दोन प्रतिनिधी सभेस पाठवावे.

## सभेचे विषय

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचुन मंजुरी देणे.

२) ऑडीट रिपोर्टला मंजुरी देणे.

३) अहवालास मंजुरी देणे.

४) अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

५) २०१६-१७ चे राज्य स्पर्धेचे वेळापत्रक निश्चित करणे.

६) राष्ट्रीय स्पर्धा आयोजना बाबत चर्चा करणे.

७) अध्यक्षाच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

सरचिटणीस
महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन

कोरम अभावी तहकुब झालेली सभा याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. या सभेला कोरमची आवश्यकता राहणार नाही.

Scanned with CamScanner

# अहवाल

२०१५-१६ चा राज्य संघटनेचा अहवाल सादर करतांना खुप आनंद होत आहे. कारण भारतीय तलवारबाजी महासंघाच्या सरचिटणीस पदी पहिल्यांदाच श्री.अशोक दुधारे यांच्या रुपाने महाराष्ट्राला संधी मिळाली आहे. दुधारे सरांचे तलवारबाजी खेळाच्या प्रसार व प्रचारातील योगदान व त्यांच्या संघटन कौशल्यामुळेच त्यांची एकमताने सरचिटणीस पदी नियुक्ती झाली आहे ही बाब आपल्या सर्वांसाठी अतिशय गौरवाची आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचा व भारताचा सर्वोत्कृष्ठ खेळाडु अजिंक्य दुधारेने राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत वैयक्तिक सुवर्ण पदक पटकावुन रियो ऑलिम्पिक स्पर्धेच्या पात्रता फेरीत सहभाग घेतला व त्याने खेळाचे प्रदर्शन करुन त्याने महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्वल केले आहे याचा विशेष आनंद होत आहे. तसेच जॉर्डन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत दिक्षा तोलानी या खेळाडूने कांस्य पदक पटकावुन देशाचे नाव उंचावले आहे.

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनच्या अधिपत्याखाली खालील ठिकाणी राज्य स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. नाशिक जिल्हा तलवारबाजी संघटनेने यावर्षी ३ राज्य व १ राष्ट्रीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन करुन महाराष्ट्राचे नाव लौकीक केले आहे. १० वी कुमार कुमारी राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन दिनांक २८ ते ३० जून २०१५ च्या दरम्यान नवरंग मंगल कार्यालय, पंचवटी, नाशिक येथे यशस्वी रित्या आयोजित करण्यात आले, तसेच २३ वी ज्युनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन नाशिक येथे १७ ते १९ डिसेंबर २०१५ चे दरम्यान उत्कृष्टपणे करण्यात आले, तसेच महाराष्ट्रातील खेळाडुंना तलवारबाजी खेळामध्ये जास्तीत जास्त संधी उपलब्ध व्हावी व चांगले दर्जेदार खेळाडु घडावेत हा उदात्त हेतु डोळयासमोर ठेवून मा.श्री.अशोकजी दुधारे यांनी १ ली आमंत्रित राज्यस्तरीय अजिंक्यपद तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धा नाशिक येथे १६ ते १७ डिसेंबर २०१५ चे दरम्यान उत्कृष्टपणे आयोजित करण्यात आल्या. तसेच ६ व्या मिनी राष्ट्रीय तलवारबाजीचे २० ते २२ जुलै २०१५ चे दरम्यान यशस्वी आयोजन केले. सदरील स्पर्धा आयोजनासाठी श्री.दत्ता पाटील, श्री.अशोक दुधारे, श्री.राजु शिंदे, श्री.नितीन हिंगमिरे, श्री.मधुकर देशमुख, श्री.पांडुरंग गुरव तसेच सर्व जिल्हा संघटनेचे पदाधिकारी यांनी परीश्रम घेतल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

१७ व्या सबज्युनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन दि.२४ ते २६ जुलै २०१५ दरम्यान सिंदखेड राजा, बुलढाणा येथे बुलढाणा जिल्हा फेन्सिंग असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले. अध्यक्ष श्री.शिवाजीराजे जाधव, श्री.शेषनारायण लोढे व जिल्हा संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेऊन स्पर्धा यशस्वीरित्या आयोजित केल्या. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

Scanned with CamScanner

३ री युथ राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन सोलापुर येथे दिनांक ७ ते ९ ऑगस्ट २०१५ चे दरम्यान सोलापूर येथे जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने यशस्वी रित्या करण्यात आली. प्रा.प्रियंका कादुळे, सिंहगड इन्स्टिटयुटचे संजय नवले, जिल्हा अध्यक्ष श्री.प्रकाश काशिद, सचिव राजु माने, प्रकाश कादुळे, कट्टीमनी, जिल्हा असोसिएशनचे सर्व पदाधिकारी यांना धन्यवाद देतो.

२६ व्या वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन अहमदपुर, लातुर येथे दि.६ ते ८ नोव्हेंबर २०१५ चे दरम्यान लातुर जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने करण्यात आले. स्पर्धा उत्कृष्टपणे आयोजित करण्यात आल्या त्याबद्दल श्री.दत्ता गलाले, डॉ.अभिजीत मोरे व जिल्हा संघटनेचे सर्व पदाधिकारी यांना धन्यवाद देतो.

१२ व्या कॅडेट राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन नांदेड येथे दि.१ ते ३ जानेवारी २०१६ चे दरम्यान नांदेड जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने यशस्वी रित्या करण्यात आले. त्याबद्दल जिल्हा संघटनेचे श्री.जनार्दन गुपीले, राहुल वाघमारे, सुनिल डोसलवार, विनोद जमधाडे व सर्व पदाधिकारी यांना धन्यवाद देतो.

१७ वी सबज्युनियर व १२ वी कॅडेट राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन १९ ते २२ जानेवारी २०१६ दरम्यान नांदेड येथे यशस्वीपणे आयोजित करण्यात आले व २६ वी वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धा व ३ री युथ राष्ट्रीय स्पर्धेचे शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे येथे दि.२३ ते २७ मार्च २०१६ दरम्यान यशस्वी आयोजन केले. या स्पर्धा आयोजनासाठी जनार्दन गुपीले, राहुल वाघमारे, रवी चौधरी, अविनाश दुधाने, सचिन शेळके व नांदेड जिल्हा तलवारबाजी संघटना व पुणे जिल्हा तलवारबाजी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना धन्यवाद देतो.

शालेय राज्य तलवारबाजी स्पर्धेचे मुंबई शहर येथे यशस्वी आयोजन करण्यात आले त्यासाठी उपसंचालक अनंत व्यंकेश्वर, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.नवनाथ फरताडे, क्रीडा कार्यालयाचे सर्व अधिकारी आदींसह जिल्हा संघटनेचे सचिव राहुल वाघमारे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना मी धन्यवाद देतो.

**<u>विद्यापीठ क्रीडा स्पर्धा :</u>**

विद्यापीठ क्रीडा स्पर्धेमध्ये गेल्या काही वर्षापासून तलवारबाजी या खेळाचा समावेश करण्यात आला असून तलवारबाजीच्या स्पर्धा नियमितपणे विद्यापीठात नियमितपणे सुरु झालेल्या आहेत. चंदिगड येथे झालेल्या विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रातील १० विद्यापीठ सहभागी झाले होते. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे खेळाडु सागर मगरे, स्वप्निल तांगडे, तुषार आहेर, पिराजी कुसळे, सुरज पाटील आदिंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन दोन कांस्य व एक रौप्य पदक पटकावुन अखिल भारतीय तलवारबाजी स्पर्धेत चौथा क्रमांक पटकाविला आहे. तसेच मुंबई विद्यापीठाच्या निशा पुजारी, स्नेहल पवार, अमरीता जॉन, निलोफर शेख आदिंनी सेबर मुली सांघिक प्रकारात कांस्य पदक पटकाविले. सोलापुर विद्यापीठातील श्वेतांबरी मालप हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन वैयक्तिक कांस्य पदक पटकाविले. आंतरविद्यापीठ स्तरावरील वरील सर्व पदक विजेत्या खेळाडुंचे अभिनंदन.

Scanned with CamScanner

## शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाश कादुळे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार संघटक | - | सोलापूर |
| २) | शेषनारायण लोढे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार संघटक | - | बुलढाणा |
| ३) | डॉ.उदय डोंगरे, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मार्गदर्शक | - | औरंगाबाद |
| ४) | दिनेश वंजारे, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडु | - | औरंगाबाद |
| ५) | निशा पुजारे, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडु | - | ठाणे |
| ६) | नंदकुणाल धनविजय, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडु | - | नागपूर |
| ७) | अर्चना लाड, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडु | - | सांगली |

## जिल्हा क्रीडा पुरस्कार विजेते

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नवल गुप्ता, गुणवंत खेळाडु पुरस्कार | - | नागपूर |
| २) | श्रेया अय्यलवार, गुणवंत खेळाडु पुरस्कार | - | नागपूर |
| ३) | दिपक अय्यलवार, गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार | - | नागपूर |
| ४) | सौरभ तोमर, गुणवंत खेळाडु पुरस्कार | - | भंडारा |
| ५) | रोशनी मुर्तडक, गुणवंत खेळाडु पुरस्कार | - | नाशिक |
| ६) | दिग्विजय सोनवणे, गुणवंत खेळाडु पुरस्कार | - | नाशिक |

## इतर पुरस्कार विजेते

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ.अभिजीत मोरे, महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार | - | लातुर |
| २) | आदित्य घोरपडे, गुणवंत क्रीडा पत्रकार पुरस्कार | - | सांगली |
| ३) | शुभम जाधव, जगप्रसिध्द महान मल्ल पै.व्यंकप्पा बुरुड राज्य क्रीडा पुरस्कार | - | सांगली |

## राज्य संघटनेचे पुरस्कार - २०१५-१६

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अक्षय देशमुख - उत्कृष्ट खेळाडु (वरिष्ठ गट) - पुरुष | - | नाशिक |
| २) | रोशनी मुर्तडक - उत्कृष्ट खेळाडु (वरिष्ठ गट) - महिला | - | नाशिक |
| ३) | ऋत्विक शिंदे - उत्कृष्ट खेळाडु (कनिष्ठ गट) - मुले | - | नाशिक |
| ४) | ज्योती सुतार - उत्कृष्ट खेळाडु (कनिष्ठ गट) - मुली | - | कोल्हापूर |
| ५) | प्रफुल्ल धुमाळ - उत्कृष्ट पंच | - | कोल्हापूर |
| ६) | उत्कृष्ट स्पर्धा आयोजक जिल्हा | - | लातुर |
| ७) | उत्कृष्ट प्रगतीपथावरील जिल्हा | - | सोलापूर |

तलवारबाजी खेळातील वरील गुणवंत खेळाडु, गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत संघटकांना महाराष्ट्र शासनाने व इतर संस्थांनी गौरविल्याबद्दल सर्वांचे हार्दिक अभिनंदन !

Scanned with CamScanner

**आंतरराष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धा :**

जॉर्डन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत दिक्षा तोलानी हिने वैयक्तिक इप्पी प्रकारात कांस्य पदक पटकावून भारताचे नाव उज्वल केले त्याबद्दल तिचे हार्दिक अभिनंदन. त्याचप्रमाणे या स्पर्धेत महाराष्ट्रातील संजना उईके, दुर्गेश जहाँगिरदार, दिग्विजय देशमुख, साईराज इंगळे, जाहीद खान, जय खंडेलवाल यांनी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले होते त्यांचे अभिनंदन. त्याचप्रमाणे बँकॉक येथे झालेल्या स्पर्धेत अजिंक्य दुधारे याने इप्पी प्रकारात कांस्य पदक पटकाविले. तसेच अक्षय देशमुख, अश्विन दाभाडे, आनंद करविंदकर, ध्रुवेश वाघ, आशिष शार्दुल, श्रेयस मासुरकर, दिग्विजय मानकर, वैष्णवी पाटील, साक्षी बिरुड, प्रतिक्षा दरेकर यांनी आंतरराष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**प्रशिक्षण शिबीर :**

महाराष्ट्र मिनी संघाचे प्रशिक्षण नाशिक येथे होऊन संघ राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला. सबज्युनियर व कॅडेट संघाचे प्रशिक्षण शिबीर नाशिक येथे आयोजित करण्यात आले व संघ भिलाई, छत्तीसगड येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे खेळाडु सहभागी झाले. ज्युनियर संघाचे प्रशिक्षण शिबीर नाशिक येथे लावण्यात आले होते. ग्वालियर (मध्यप्रदेश) येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचा संघ सहभागी झाला होता. वरिष्ठ गटाची व युथ गटाची राष्ट्रीय स्पर्धा पुणे येथे संपन्न झाली. या संघाचे प्रशिक्षण शिबीर औरंगाबाद येथे संपन्न होऊन राष्ट्रीय स्पर्धेत संघ सहभागी झाला.

**खेळाडु आरक्षण :**

महाराष्ट्र शासनाने नोकर भरती खेळाडुंसाठी आरक्षण ठेवले आहे. त्याचा फायदा महाराष्ट्रातील अनेक फेन्सिंगच्या खेळाडुंना मिळाला व ते सध्या शासकीय सेवेत कार्यरत आहेत. या निर्णयाबद्दल महाराष्ट्र शासनाचे व क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे आभार.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, क्रीडा मंत्री विनोद तावडे साहेब, शिक्षण व क्रीडा सचिव सहारिया, सतिश जोंधळे साहेब, श्री.नरेंद्र सोपल साहेब, संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, उपसंचालक सर्वश्री माणिक ठोसरे साहेब, आनंद व्यंकेश्वर साहेब, जनक टेकाळे साहेब, मोटे साहेब, चंद्रकांत कांबळे साहेब, देशमुख मॅडम, आधाने साहेब, रवि नाईक साहेब, संजय सबनीस साहेब, चंदीगड पोलीस आयुक्त जगदिश मित्तल तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी सुधीर मोरे, बोबडे साहेब, अजय पवार साहेब, मोराळे मॅडम, राजपुत साहेब, महादवाड साहेब, गोकुळ तांदळे, श्री.अरुण पाटील साहेब, तसेच महाराष्ट्राचे सर्व जिल्हा क्रीडाधिकारी, क्रीडा कार्यालयाचे प्रतिनिधी यांनी वेळोवेळी फेन्सिंगच्या खेळाडुंसाठी योग्य ते निर्णय घेतले त्याबद्दल त्यांचे आभार.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष मा.अजित पवार, उपाध्यक्ष सुरेश कलमाडी, सतिश प्रधान, शामराव आष्टेकर, सरचिटणीस बाळासाहेब लांडगे, मा.कुलगुरु बी.ए.चोपडे, भारतीय ऑलिम्पिक महासंघाचे सदस्य श्री.नामदेव शिरगावकर, श्री.प्रल्हाद सावंत, श्री.प्रताप जाधव, महेंद्र चेंबुरकर, महशे लोहार, श्री.भोसले यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल आभार. महाराष्ट्र सॉफ्टबॉल असो.चे सरचिटणीस डॉ.प्रदिप तळवेलकर, महाराष्ट्र बेसबॉल असो.चे सरचिटणीस राजेंद्र इखलकर, महाराष्ट्र कॉर्फ बॉल असो.चे सरचिटणीस प्रविण मानवटकर, महाराष्ट्र नेटबॉल असो.चे सरचिटणीस संजय पाटील, महाराष्ट्र आटयापाटया असो.चे अध्यक्ष दिपक कविश्वर, महाराष्ट्र सायकल पोलो असो.चे सरचिटणीस गजानन बुरुडे, महाराष्ट्र वुडबॉल असो.चे सरचिटणीस विकास टोणे, महाराष्ट्र थ्रो-बॉल असो.चे सरचिटणीस किरण फुलझेले, मुरलीधर मुरारकर, कोषाध्यक्ष दिनेश अहिरे, महाराष्ट्र टेनिस व्हॉलबॉल असोसिएशनचे सरचिटणीस व्यंकटेश वंगवाड, संयोजन समिती सचिव आनंद खरे, महाराष्ट्र रस्सीखेच असो.चे सरचिटणीस जे.यु.गोपीले, महाराष्ट्र शटल कॉक असो.चे अशोक पवार, महाराष्ट्र किक बॉल असो.चे प्रशांत नाईक, सरचिटणीस, महाराष्ट्र खो-खो असो.चे श्री.चंद्रजित जाधव, श्री.मंदार देशमुख, महाराष्ट्र कबड्डी असो.चे श्री.बाबा इंगळे, महाराष्ट्र ॲथलेटीक्स असो.चे प्रल्हाद सावंत व इतर सर्व संघटनांचे पदाधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार. राज्य संघटनेचे मार्गदर्शक सर्वश्री अशोक दुधारे, अध्यक्ष प्रकाश कादुळे, कार्याध्यक्ष प्रमोद वानखेडे, उपाध्यक्ष मा.आ.चंद्रकांत सोनवणे, पद्माकर जगदाळे, शेषनारायण लोढे, प्रा.सुधिर कहाते, कोषाध्यक्ष राजकुमार सोमवंशी, सहसचिव डॉ.पांडुरंग रणमाळ, अविनाश दुधाने, विलास वाघ, शोएब मोहम्मद, सदस्य डॉ.अभिजीत मोरे, राजु शिंदे, दिलीप घोडके, राहुल वाघमारे, आर.आर.पवार, विनय जाधव, केदार ढवळे, संजय इसाळकर, श्रीकांत देशमुख, राहुल वाघमारे (नांदेड), सुधीर जमधाडे, अनिल रावळे व डॉ.अर्जुन मोरे तसेच सर्व जिल्हा संघटनेचे अध्यक्ष, सरचिटणीस व पदाधिकारी यांनी वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शक केले त्याबद्दल त्यांचे आभार मानुन अहवाल संपवतो. तसेच महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्र प्रामुख्याने लोकमत, दिव्य मराठी, सकाळ, लोकपत्र, गावकरी, देशदूत, लोकसत्ता, टाईम्स ऑफ इंडिया, महाराष्ट्र टाईम्स, पुण्य नगरी, देशोन्नती व इलेक्ट्रॉनिक्स मिडीया यांचे संपादक प्रतिनिधी यांनी वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभार.

राज्य संघटनेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य करणारे मा.आ.सतिशभाऊ चव्हाण, महापौर त्रिंबक तुपे, मा.आ.संजयभाऊ शिरसाठ, एस.पी.जवळकर, औरंगाबाद म.न.पा.सभागृह नेता राजेंद्रभाऊ जंजाळ, अंबादास दानवे, विरेंद्र भांडारकर, डॉ.प्रदिप देशमुख, डॉ.आप्पासाहेब हुंबे, उच्च शिक्षण संचालक मा.श्री.धनराज माने, एम.जी.एम.संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.प्रविण सुर्यवंशी, मा.संपादक चक्रधर दळवी, श्रीमती निलिमाताई पवार, अरविंद कारे, शरद कोशिरे, क.का.वाघ शिक्षण

Scanned with CamScanner

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशिनाथदादा टर्ले, विश्वस्थ चांगदेवदादा होळकर, डॉ.कैलास कमोद, नाना महाले, आनंद खरे, नितीन हिंगमिरे, संजयराव देशमुख, राजेंद्र कुलथे, गोविंदराव देशमुख, दत्ता पाटील, अण्णासाहेब पाटील, श्री.नरेंद्र छाजेड, राधेश्याम मुंदडा, साहेबराव पाटील, श्री.रविंद्र मोरे, नंदकिशोर खैरनार, अशपाक शेख, उदय खरे, श्री.खांडवे, श्री.आव्हाड, रमेश मारवाडी, मधुकर देशमुख, श्री.तळाजिया, आकाश छाजेड, तसेच फेन्सिंग असो.ऑफ इंडिया अध्यक्ष डी.डी.बोरो, सरचिटणीस संजय प्रधान, क्रीडा व युवा संचालनालय कार्यालयाचे श्री.मोरे, उदय पवार, श्री.देशपांडे, विजय पाटील, राजेश क्षत्रिय, रुपल गुप्ता, रवि नाईक, धनंजयराव महाडीक या सर्वांच्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. तसेच राज्य संघटनेला वेळोवेळी मदत करणारे शिवछत्रपती पुरस्कार विजेते ॲड.आयफाज कुरेसी, लक्ष्मी चौरे, वैशाली नागुलवार, निलेश गुरुळे, श्रध्दा वायदंडे, योगेश पटेल, श्वेता चंदालिया, ज्ञानेश्वर निगळ, श्रुती वायदंडे, शिल्पा नेने, तनुजा पटेल, रेफ्री बोर्ड चेअरमन विनय जाधव, राजु शिंदे, प्रशांत जगताप, सुरज येवतीकर, निर्मला चौधरी, कैलास लवांड यांच्यासह सर्व आजी-माजी खेळाडु, क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रेमींना धन्यवाद देतो.

तसेच पत्रकार शिवाजी गोरे, राजेश शर्मा, जयंत कुलकर्णी, सुधिर भालेराव, किशोर बागडे, नितीन गायकवाड, आदित्य वाघमारे, तुषार वखरे, विजय साठे, दिक्षित साहेब, भालेराव साहेब, नाना खैरनार, अविनाश पाटील, नरेश बोरसे, अविनाश ओंबासे, रविंद्र एरंडे, धनंजय रिसोडकर, आदित्य घोरपडे, प्रल्हाद सावंत, श्री.मदने, श्री.वाघमारे, श्री.माधव शेजुळ, श्री.मंडलिक, श्री.नितीन भालेराव, महेश पठाडे साहेब, श्री.सुर्यवंशी, श्री.शेळके, आनंद खरे, अविनाश खैरनार, मैदान विजेताचे प्रशांत नवगिरे, विश्व मैदानाचे मिलिंद येवले, सर्व इलेक्ट्रॉनिक्स मिडिया प्रिटंस् मिडिया यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

धन्यवाद !

**डॉ.उदय डोंगरे**
**सरचिटणीस**
**महाराष्ट्र स्टेट फेन्सिंग असोसिएशन**

Scanned with CamScanner